प्रशासकीय मान्यता

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षातील मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी या योजनेंतर्गत मंजुर ग्रामपंचायतीच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत. (मौजे शेंडेवाडी, ता.संगमनेर व इतर ३७ कामे)

जिल्हा परिषद अहमदनगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-४/१७१७/२०२३
दि:- ३० ऑक्टोबर, २०२३

**वाचा** –१.ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.ग्रापंई-२०१७/प्र.क्र.२४६/बांधकाम-४, दि:-२३/०१/२०१८
२.ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्र.ग्रापंई-२०१८/प्र.क्र.५३/बांधकाम-४, दि:-०२/११/२०१८
३.ग्रा.वि.विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांकःझेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दि:- ०६/०९/२०२१
४.ग्राम विकास विभाग शासन निर्णय क्रःग्रापंई-२०२०/प्र.क्र.४४/बांधकाम-४, दि:-३१ मार्च २०२२
५.ग्राम विकास विभागाकडील पत्र क्रःसंकीर्ण-२०२२/प्र.क्र.३१४/बांध-४, दि:-१९/०७/२०२२
६.ग्राम विकास विभागाकडील पत्र क्रःसंकीर्ण-२०२२/प्र.क्र.३१४-भाग-२/बांध-४, दि:-२२/०५/२०२३

सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी या योजने अंतर्गत १००० पेक्षा कमी / १००० ते २००० / २००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या व स्वतःच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नसलेल्या ग्रामपंचायतींना स्वतःचे कार्यालय बांधण्यास शासनाने संदर्भीय शासन निर्णयान्वये सोबतचे परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या ग्रामपंचायतींना मंजुरी प्रदान केलेली आहे.

मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी या योजनेंतर्गत ग्राम विकास विभागाकडील उपरोक्त संदर्भ ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता नियम १९६८ चे नियम ४ परिशिष्ट २ अन्वये सोबतचे परिशिष्टामधील नमुद मंजुर कामांना कामनिहाय रक्कमेस संदर्भ क्र १, २, ४ मधील तसेच खाली नमुद केलेल्या अटी व शर्तींना अधीन राहून प्रशासकीय मान्यता देणेत येत असुन एकुण रक्कम रुपये ६६६.०० लक्ष निधी मंजुर करणेत येत आहे.

सदर बाबींवर होणारा खर्च मागणी क्र एल-३, मुख्य लेखाशिर्ष २५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम, १९८-ग्रामपंचायतींना सहाय्य (००), (००)(१०) मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातेश्री ग्रामपंचायत बांधणी योजना (२५१५२५५७), ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) जि.प.संकेतांक २०४३३ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. संदर्भीय शासन निर्णयान्वये मंजुर करण्यात आलेली सोबतच्या परिशिष्टामधील नमुद कामे दि:-३१ मार्च २०२४ पर्यंत पुर्ण करण्यात यावीत.

**अटी व शर्तीः-**

१.मा.बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी या योजनेंतर्गत सोबतचे परिशिष्टामधील नमुद ग्रामपंचायती संदर्भ क्र १, २ व ४ मधील नमुद तसेच संबधित ग्रामपंचायतीस ग्रामपंचायत कार्यालयास स्वतःची इमारत नाही, ग्रामपंचायत कार्यालय बांधकामास पुरेशी जागा उपलब्ध असुन सदर जागेवर इमारत बांधकामास इतर कायदेशीर अडचणी नाही, सदर ग्रामपंचायतीस या किंवा अन्य योजनेतुन ग्रामपंचायत कार्यालय मंजुर नाही, लोकसंख्येच्या टप्प्याप्रमाणे शासनाने निश्चित केलेल्या मुल्यानुसार सदर ग्रामपंचायत स्व-निधी खर्च करण्यास तयार असुन त्याबाबतचा संबधित ग्रामपंचायतींने ग्रामसभा ठराव संमत केलेला आहे व संबधित ग्रामपंचायतीची लोकसंख्या (सन २०११ च्या जनगणनेनुसार) या निकषांची पुर्तता करीत असलेबाबत गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांनी सादर केलेल्या

पंचायत समिती पारनेर
ग्रा.पं.
09 NOV 2023

माहितीच्या अधीन राहुन संबधित ग्रामपंचायतीच्या इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेत आलेली आहे.

२.सदर प्रशासकीय मान्यता आदेश मिळताच गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांनी मंजुर कामांचे प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह तयार करुन घेवुन (अंदाजपत्रक तांत्रिक मान्यतेसह) आपले स्तरावर कायमस्वरुपी जतन करुन ठेवावेत.

३.सदर प्रशासकीय मान्यता प्रदान केलेल्या सर्व कामांसाठी जिल्हा परिषदेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार तांत्रिक मंजुरी, निविदा काढणे / स्वीकारणे इत्यादी बाबतची कार्यवाही सक्षम प्राधिका-याकडुन करुन घेण्याची जबाबदारी ग्रामसेवक (संबधित ग्रामपंचायत) / गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांची राहील.

४.सदर मंजुर कामांना कार्यारंभ आदेश हा उक्त नमुद कालमर्यादेतच (दि:-३१ मार्च २०२४) देवुन, विहित कालावधीतच संबधित कामे पुर्णत्वास आणावीत. विहित केलेल्या कालावधीनंतर कार्यारंभ आदेश दिल्याचे निदर्शनास आल्यास संबधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

५.प्रस्तुत इमारत बांधकामामध्ये ग्रीन बिल्डींग संकल्पना अंमलात आणुन, नैसर्गिक प्रकाशयोजना व वायुवीजन, पाण्याच्या व उर्जेच्या वापरात काटकसर, पर्जन्य जलपुनःर्भरण आणि जास्तीत जास्त पर्यावरणपुरक बांधकाम साहित्य व साधन-सामुग्रीचा वापर करणे आवश्यक राहील.

६.शासनाने मंजुर केलेला निधी त्याच कामासाठी खर्च करावयाचा असुन, सदरील कामे मंजुर अनुदानाच्या मर्यादेतच पुर्ण होतील याची दक्षता घेण्यात यावी व जास्तीचे दायित्व निर्माण करुन नये. तसेच मंजुर किंमतीपेक्षा जास्त होणारा खर्च संबधित ग्रामपंचायतीस करावा लागेल.

७.सदर प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली सर्व कामे इतर योजनेतुन मंजुर नाहीत / प्रस्तावित नाहीत किंवा यापुर्वी झालेली नाहीत याची खातरजमा करणेची जबाबदारी ग्रामसेवक (संबधित ग्रामपंचायत) / उपअभियंता (संबधित उपविभाग) / गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांची राहील. तसेच सदर कामे पुर्ण झालेनंतर त्याची देखभाल दुरुस्ती ज्या त्या ग्रामपंचायतींनी करावयाची आहे.

८.सदर मंजुर कामे ग्रामपंचायतीच्या जागेतच करावयाचे असुन जागेअभावी काम रद्द होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी संबधित ग्रामपंचायतीची राहील. मंजुर काम मंजुर ठिकाणीच करणेत यावे. तसेच मंजुर काम जिल्हा परिषद / सरकार जागेत करावयाचे असल्यास, जिल्हा परिषदेची / मा.जिल्हाधिकारी यांची परवाणगी घेणे बंधनकारक राहिल.

९.सदर मंजुर कामांचा दर्जा व गुणवत्ता ही शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मानकाप्रमाणे असावीत. ती तशी न नसल्यास ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक व कंत्राटदार / संबधित यंत्रणा यांना सामुहिक व वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

१०.सदर मंजुर सर्व कामांची राज्य गुणवता निरिक्षक (एस.क्यु.एम) यांचेकडुन शासन निर्णयानुसार तपासणी करुन घेण्यात यावी.

११.सदर कामाबाबत जनतेच्या तक्रारी उद्‌भवल्यास संबंधित जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांनी समक्ष जागेवर तक्रारीची शहानिशा करावी किंवा स्वतंत्र गुणवत्ता नियंत्रकाकडून फेरतपासणी करावी. जर कामाचा दर्जा निकृष्ट आढळून आल्यास संबंधित तपासणी यंत्रणा जबाबदार राहील.

१२.सदर योजने अंतर्गत होणा-या कामांचे सामाजिक निरिक्षण करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ४९(१) मधील तरतूदीनुसार ग्रामसभा ग्राम विकास समित्या गठित करु शकतात. त्यानुसार सदर योजनेसाठी ग्रामसभेत एक ग्राम विकास समिती गठित करुन त्याव्दारे सदर योजने अंतर्गत होणा-या कामांचे सामाजिक निरिक्षण करावे व सदर अहवाल इकडेस सादर करावा.

१३.उपरोक्त संदर्भीय तसेच प्रचलित शासन निर्णयान्वये, शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सुचनेनुसार सर्व अटी व शर्ती लागु राहीतील.

१४.सदर कामे पुर्ण झालेवर काम पुर्णत्वाचे दाखले तात्काळ जिल्हा परिषदेस सादर करणेत यावेत.

१५.तालुका स्तरावरील गट विकास अधिकारी / उपअभियंता यांनी सदर कामांची वेळोवेळी पहाणी करून मासिक प्रगती अहवाल इकडेस सादर करावयाचा आहे.

१६.ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे नवीन बांधकाम असल्यास ते शासन निर्णय क्रमांकःग्रापई-२०१३/प्र.क्र.१८९/पंरा-७ दि:-३०/०१/२०१४ मधील नमुद नमुना आराखडा क्र.एडीएम/५५२६, नकाशा क्र.३ नुसारचं करण्यात यावे.

१७.सदर आदेशासोबतच्या परिशिष्टामध्ये नमुद केलेली कामे माहे मार्च २०२४ पर्यंतच पुर्ण करुन त्यावरील प्रत्यक्ष खर्च (वजावटीसह) झालेली रक्कम जिल्हा परिषद मार्फत ग्रामविकास विभागाकडुन माहे मार्च २०२४ पर्यंतच प्राप्त करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित एजन्सी / यंत्रणेची आहे. तसेच सदर कामांचा निधी ग्रामपंचायतींना गट विकास अधिकारी यांचे मार्फत वितरीत करणेत येईल.

१८.सदर आदेशासोबतच्या परिशिष्टामधील नमुद केलेली विकास कामे हाती घेण्यापुर्वी संबधित क्षेत्रात जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुका / पोट निवडणुकांसाठी आचारसंहिता अंमलात नाही याबाबत ग्रामसेवक (संबधित ग्रामपंचायत) / गट विकास अधिकारी (संबधित पंचायत समिती) यांनी खात्री करावी. तसेच सदर कामे दर्जेदार व चांगल्या प्रतीचे असल्याबाबत विहित समिती / संबधितांकडुन खात्री करुन घेण्यात यावी. कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, याची सर्व संबधितांनी दक्षता घ्यावी. याबाबत संबधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी विशेष दक्षता घ्यावी, अन्यथा कसुरदारांवर जिल्हा परिषद स्तरावरुन कारवाई करण्यात येईल.

१९.सदर कामे पुर्ण झालेनंतर शासकीय कपाती (रॉयल्टी, लेबर सेस, आयटी टॅक्स, सर्व्हीस टॅक्स, जीएसटी इ.) करण्यात येवुन त्यांचा मुदतीत भरणा करणेचे जबाबदारी संबधित विभागाची / यंत्रणेची राहील.

२०.उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयान्वये सदर मंजुर ग्रामपंचायत कार्यालयाच्या बांधकामासाठी निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने विहित केलेल्या टक्केवारीच्या मर्यादेत ग्राम विकास विभागाकडुन जिल्हा परिषदेस निधी वितरीत करणेत आलेनंतर, सदर प्राप्त झालेला निधी संबधित विकास कामावर वितरीत करणेत येईल.

30/10/2023

**(दादाभाऊ गुंजाळ)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद अहमदनगर**

**(आशिष येरेकर, भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर**

**प्रति,**

१.संबधित ग्रामपंचायत, व्दारा:-गट विकास अधिकारी, पंचायत समिती------------------

प्रत :- अवर सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, मुंबई ४०० ००१.

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर.

प्रत :- कार्यकारी अभियंता, जि.प.सा.बा.(उत्तर/दक्षिण)/ग्रा.पा.पु/ल.पा.विभाग, अहमदनगर.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती-----------------------

प्रत :- उपअभियंता, जि.प.सा.बा/ल.पा/ग्रा.पा.पु, उपविभाग--------------------------

**परिशिष्ट**

**जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-९/१७१७/२०२३ दि:- ३०ऑक्टोबर, २०२३ आदेशासोबतचे परिशिष्ट**

| अ. क्र | तालुका | ग्रा.पं.नाव | कामाचे नाव | लोकसंख्या (सन २०११ जनगणना) | रक्कम (रु.लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ग्रा.पं. हिस्सा | शासन हिस्सा | एकुण |
| १ | संगमनेर | शेंडेवाडी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १४५५ | २.७० | १५.३० | १८.०० |
| २ | संगमनेर | पेमगिरी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ३६४३ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| ३ | संगमनेर | चिचपुर | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ४६८९ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| ४ | संगमनेर | पिंपळे | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | २०२५ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| ५ | कोपरगांव | शहापुर | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १२३६ | २.७० | १५.३० | १८.०० |

| अ. क्र | तालुका | ग्रा.पं.नाव | कामाचे नाव | लोकसंख्या (सन २०११ जनगणना) | रक्कम (रु.लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ग्रा.पं. हिस्सा | शासन हिस्सा | एकुण |
| ६ | कोपरगांव | सोनारी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ९८८ | १.२० | १०.८० | १२.०० |
| ७ | राहुरी | वांजुळपोई | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १६३२ | २.७० | १५.३० | १८.०० |
| ८ | राहुरी | संक्रापुर | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १४२१ | २.७० | १५.३० | १८.०० |
| ९ | राहुरी | कोल्हार खुर्द | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ६९८६ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| १० | श्रीरामपुर | खानापुर | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | २२६५ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| ११ | श्रीरामपुर ऐवजी राहुरी | केंदळ बु | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | २०४० | ३.६० | १४.४० | १८.०० |
| १२ | श्रीरामपुर ऐवजी राहुरी | तांभेरे | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ३९१८ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| १३ | नेवासा | देवसडे | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १६९८ | २.७० | १५.३० | १८.०० |
| १४ | नेवासा | प्रवरासंगम | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ४५८८ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| १५ | नेवासा | रांजणगांव देवी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ३१४३ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| १६ | पाथर्डी | शिराळ | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | २८७१ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| १७ | पाथर्डी | आडगांव | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ३६१३ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| १८ | पाथर्डी | कोल्हार | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | २५५४ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| १९ | पाथर्डी ऐवजी नगर | जेऊर बायजाबाई | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ९३६३ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| २० | पारनेर | लोणी हवेली | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १८०७ | २.७० | १५.३० | १८.०० |
| २१ | पारनेर | पानोली | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | २१९९ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| २२ | पारनेर | भोयरे गांगर्डा | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १३२५ | २.७० | १५.३० | १८.०० |
| २३ | पारनेर | ढोकी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १५९७ | २.७० | १५.३० | १८.०० |
| २४ | पारनेर | पळसपुर | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १८९६ | २.७० | १५.३० | १८.०० |
| २५ | श्रीगोंदा | थिटेसांगवी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १३४० | २.७० | १५.३० | १८.०० |
| २६ | श्रीगोंदा | चवरसांगवी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ४४७ | १.२० | १०.८० | १२.०० |
| २७ | श्रीगोंदा | बांगर्डे | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १६८५ | २.७० | १५.३० | १८.०० |
| २८ | शेवगांव | प्रभुवाडगांव | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १५११ | २.७० | १५.३० | १८.०० |
| २९ | शेवगांव | सोनेसांगवी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १०४० | २.७० | १५.३० | १८.०० |
| ३० | अकोले | नाचणठाव | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ५०५ | १.२० | १०.८० | १२.०० |
| ३१ | अकोले | कळस खु | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १९२३ | २.७० | १५.३० | १८.०० |
| ३२ | कर्जत | कानगुडवाडी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १६३५ | २.७० | १५.३० | १८.०० |
| ३३ | कर्जत | बारडगांव दगडी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ३२८४ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| ३४ | कर्जत | शिंदे | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ३५७९ | ३.६० | १४.४० | १८.०० |
| ३५ | कर्जत | सोनाळवाडी | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १११८ | २.७० | १५.३० | १८.०० |
| ३६ | जामखेड | धनेगांव | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | १५३७ | २.७० | १५.३० | १८.०० |

| अ.क्र | तालुका | ग्रा.पं.नाव | कामाचे नाव | लोकसंख्या (सन २०११ जनगणना) | रक्कम (रु.लाखात) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ग्रा.पं. हिस्सा | शासन हिस्सा | एकुण |
| ३७ | जामखेड | पिंपळगांव आळवा | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ११४३ | २.७० | १५.३० | १८.०० |
| ३८ | जामखेड | सातेफळ | ग्रामपंचायत कार्यालय बांधणे | ११२५ | २.७० | १५.३० | १८.०० |
| एकुण | | | | | ११२.५० | ५५३.५० | ६६६.०० |

१०|१०|२०२३
(दादाभाऊ गुंजाळ)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.)
जिल्हा परिषद अहमदनगर

(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर